भारतीय संविधान उद्देशिका कार्यक्रम नोट्स

(या नोट्सचा उद्देश साध्या-सोप्या भाषेमध्ये संविधानाची उद्देशिका आपण समजणे आणि त्यानंतर तुमच्या भागामध्ये हा कार्यक्रम स्वत:हून घेणे हा आहे. आपल्याला हा कार्यक्रम सर्वसामान्य जनतेमध्ये घ्यायचा असल्याने या कार्यक्रमाची भाषा अगदी सोपी ठेवली आहे.)

आपण कोण आहोत?

- आपण कोण आहोत? माणूस. देशाचा विचार केला तर कोण आहोत? भारतीय आहोत. आपण भारतीय आहोत म्हणजे,
    - आपला जन्म कुठे झाला? भारतात
    - आपण राहतोय कुठे? भारतात
    - शिकतोय कुठे? भारतात
    - कमवतोय कुठे? भारतात.

एवढं सगळं ज्या देशात करतोय, तो देश म्हणे एका पुस्तकावर चालतो. कुठल्या पुस्तकावर चालतो बरं? संविधान.

सेल्फी विथ संविधान

- बरं, आता मला सांगा तुमच्यापैकी किती लोकांनी लोकांनी हे संविधान नावाचं पुस्तक हातात घेऊन पाहिलंय, हात वर करा? (फार कमी लोकांनी पाहिलेलं असतं)
- बघा, आपण ज्या देशात जन्माला आलो, ज्या देशाचं खातोय, ज्या देशात शिकतोय, ज्या देशात वाढतोय, ज्या देशात कमावतोय, तो देश ज्या पुस्तकावर चालतो, ते संविधान आपण हातात घेऊन पाहिलं सुद्धा नाही. मी वाचलं का विचारलं का? नाही. मी फक्त पाहिलं का विचारलं.
- उद्या एक काम करायचं, उद्या सकाळी शाळेत/कॉलेजला आल्या आल्या पहिलं एक काम करायचं. पहिल्यांदा शिकवायला येणाऱ्या शिक्षकांच्या मागे लागायच आणि त्यांना म्हणायचं आम्हाला काय दाखवा? संविधान दाखवा. सर आले की त्यांनाच म्हणायचं की त्यांच्याच मोबाईल मध्ये आमचा एक फोटो काढा. बघा तुमच्या हातात येणारं पुस्तक आहे ना ते तुमच्या आयुष्यामध्ये पहिल्यांदा येणार आहे आणि त्याची आठवण पण राहायला पाहिजे. तर शिक्षकांना म्हणायचं की मोबाईलमध्ये माझा फोटो काढा त्याच्या सोबत सेल्फी काढा. ते तुम्ही पण जपून ठेवा. **काढाल का सेल्फी?**

संविधान म्हणजे काय ?

- शाळा / कॉलेज / हॉस्टेल / हॉस्पिटल / घर – इथे सगळीकडे नियम असतात.
- जसे शाळेचे उदाहरण घेतले तर
    - तुमच्या शाळेत तुम्ही कधीपण येता ना? – नाही
    - कोणतेही मास्तर कधीपण येऊन शिकवता ना? – नाही
    - कोणतेही कपडे घालता ना? – नाही
    - परीक्षेला बसलं, नाही बसलं तरी चालतं ना? – नाही
    - तुमची शाळा लहान आहे – पण तरी तुमच्या शाळेला किती नियम आहेत.
- तसेच एवढ्या मोठ्या देशाला चालवण्यासाठी पण नियम लागतील? ते नियम आणि मूल्य ज्यामध्ये लिहिले आहेत ते कायद्याचे पुस्तक म्हणजे संविधान.

प्रजासत्ताक दिन

- 26 जानेवारी 1950 – आपण संविधान स्वीकारले आणि आपल्या देशाचा भविष्यातील मार्ग निश्चित केला.
- या संविधानामध्ये 25 भाग, 448 कलमं आणि 12 परिशिष्ट आहेत आणि आज आपण ते सगळं आपण एक एक करून दिवसभर समजून घेणार आहोत आणि तोंडपाठ करून घेणार आहोत. बरोबर? - नाहीऽऽ
- आपण संविधान अगदी सोप्या भाषेत ते समजून घेणार आहोत.

संविधान कसे तयार झाले?

- मसुदा समितीचे अध्यक्ष – **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
- संविधान बनवण्यात सगळ्यात महत्त्वाचं काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलं. ते संविधानाच्या मसुदा समितीचे (ड्राफ्टिंग कमिटीचे) अध्यक्ष होते. त्यांच्या सोबत आणखीही लोक होते.

संविधान सभा

- संविधान सभेची स्थापना: भारतीय संविधान तयार करण्यासाठी संविधान सभा स्थापन करण्यात आली. यामध्ये 299 सदस्य होते. त्यात प्रत्येक प्रांत, धर्म, वर्ग, भाषा आणि संस्कृतीचं प्रतिनिधित्व होतं. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. सभेने 9 डिसेंबर 1946 ते 26 नोव्हेंबर 1949 या काळात, म्हणजे 2 वर्षे 11 महिने 18 दिवसांत, संविधान तयार केलं.

संविधान सभेत 15 महिला

- यामध्ये 15 महिलाही होत्या. त्या काळात इतक्या महिलांचा सहभाग असणे ही सगळ्यांसाठी खूप अभिमानाची बाब आहे.

प्रास्ताविकेत एकूण किती वाक्य आहेत?

चला, संविधान आज ना उद्या तुमच्या हातात पडेलच. पण तुम्ही रोज मात्र ही प्रास्ताविका बघितलेली आहे – कुठे पहिली आहे?

सर/मॅडम केबिन, अधिकाऱ्यांच्या मागे लावलेली असते, शाळेच्या सगळ्या पुस्तकात

- पुस्तकात म्हणजे बघा मराठीच पुस्तक असेल तर कुठल्या भाषेत असते – मराठी
- हिंदीच पुस्तक असेल तर – हिंदीत
- इंग्रजीच पुस्तक असेल तर – इंग्रजीत
- आणि गणिताच पुस्तक असेल तर – गणितात? नाही. मराठी गणिताच्या पुस्तकात मराठीत आणि इंग्रजी गणिताच्या पुस्तकात इंग्रजीत.
- आता माझा सोपा प्रश्न असा आहे की प्रत्येकाने मोजून सांगायचं – संविधानाच्या प्रास्ताविकेत एकूण किती वाक्य आहेत?

- मग चला, व्याकरणाचा सोपा नियम काय सांगतो? वाक्य संपते त्यावेळेला काय असतो – पूर्णविराम. मग किती पूर्णविराम (फुलस्टॉप) आहे? एक, तर वाक्य किती? एक.
- खरंखरं सांगा, प्रास्ताविका हे एकच वाक्य आहे – ही गोष्टी आयुष्यात आज पहिल्यांदा कोणाकोणाला कळलंय? भारतीय संविधानाची उद्देशिका हे एकच मोठं वाक्य आहे.

उद्देशिका

- काय आहे या एका वाक्यात?
- माझ्या देशामध्ये मी कोण आहे, माझ्या देशातल्या लोकांना काय मिळणार आहे, हा देश कसा घडवायचा आहे - एवढं सगळं सामावलं आहे फक्त एकाच वाक्यात. मग त्या वाक्याला समजून घेऊयात आपण.

- देशाचा विचार करता, देश कोण घडवणार, कसा घडवायचा आणि कोणत्या मार्गाने घडवायचा हे माहित असायला हवे. हेच मांडले आहे संविधानाच्या उद्देशिकेत. या उद्देशिकेचे सुध्दा तीन भाग आहेत.

  1. संविधानाच्या केंद्रस्थानी कोण आहे तर 'आम्ही भारताचे लोक' हे संविधान स्वतःला अर्पण करत आहोत.

  2. भारत कसा घडवायचा आहे हे यात स्पष्ट केलेलं आहे – लोकशाही, प्रजासत्ताक, सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, समाजवादी

  3. भारत देश कोणत्या मूल्यांवर चालेल? – स्वातंत्र्य, समानता, बंधुता तसंच सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय

तर चला मग या वाक्याला खोलात समजून घेऊयात आपण.

देश कोण घडवणार

संविधानाची सुरुवात "आम्ही भारताचे लोक" या शब्दांनी होते. आम्ही भारताचे लोक म्हणजे काय? ते का आले असेल?

- भारतीय संविधानाचा मसुदा जवळजवळ पूर्ण झाला होता. पण एक प्रश्न अजूनही उरलेलाच होता – या ऐतिहासिक दस्तऐवजाची सुरुवात नक्की कशी करायची?
- संविधान सभेत चर्चा सुरू होती…
  - H.V. कामथ म्हणाले –"सुरुवात 'In the name of God' – देवाच्या नावाने करूया!"
  - दुसऱ्याने म्हणावं – "देव नको, तर देवीच्या नावाने करा!"
  - कोणी म्हणालं – गांधींना अर्पण करू! पण गांधीवादी लोकांनीच त्याला विरोध केला.
  - तेव्हाच अनेकांनी स्पष्ट मत मांडलं – "हे संविधान कोणत्याही देवाचं नाही – हे लोकांचं आहे!"
  - याची सुरुवात 'We the People of India – आम्ही भारताचे लोक' अशा शब्दांनीच व्हायला हवी." मतभेद तीव्र झाले. मग ठरलं – चला, मतदान करूया! मतदान झालं. 41 मतं देवाच्या बाजूने आणि 68 मतं "आम्ही भारताचे लोक" या विचाराच्या बाजूने!
  - त्याच क्षणी ठरलं – भारतातील खरे मालक कोण आहेत? – "आम्ही भारताचे लोक!"

2. देश कसा घडवायचा आहे हे यात स्पष्ट केलेलं आहे / देशाचे स्वरूप कसे असेल:

सार्वभौम

सार्वभौम म्हणजे काय ते समजून घेऊया.

घरातील उदा;

- मला सांगा, तुमच्या घरात कोणती भाजी बनवायची हे कोण ठरवतं? घरातलीच लोकं ठरवतात ना? शेजारचे ठरवता ना? नाही. घरातील लोक ठरवतात.
- बरं, तुमच्या घरी कोणता टीव्ही आणायचा हे कोण ठरवतं? शेजारच्या गावची लोकं ठरवतात ना? नाही. म्हणजे आपला निर्णय आपण घेतो.
- राजेशाही मध्ये कोण निर्णय घेत होतं? राजे
- आज देशाच्या पातळीवरचे सर्व निर्णय कोण घेतं? आपल्या देशातील लोक. बाहेरच्या देशाची लोक निर्णय घेता का? नाही.
    - याचा अर्थ आपला देश स्वतःचे निर्णय स्वतः घेईल, देशाच्या बाहेरून कोणताही हस्तक्षेप असणार नाही.
    - संविधानाच्या अगोदर या देशाचे निर्णय हे ब्रिटनची राणी घेत होती आणि आता आपण सर्व घेतो. यालाच सार्वभौमत्व म्हणतात.

समाजवादी

- अन्न, पाणी, निवारा, शिक्षण, आरोग्य या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत.
- माणूस म्हणून प्रत्येकाला विकासाची संधी मिळण्यासाही सर्वांना या मुलभूत सुविधा मिळायला हव्यात, आणि हे करण्याची जबाबदारी सरकारची आहे.
    - उदा. गरिबांना अन्नासाठी – रेशन/कंट्रोल व्यवस्था, निवाऱ्यासाठी – घरकुल योजना, शिक्षणासाठी – सरकारी/अनुदानित शाळा, कॉलेज, मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती इ., आरोग्य – सरकारी दवाखाने, विविध योजना.
- हे सर्व समाजवादाच्या धोरणाअंतर्गत आहे आणि हा प्रत्येकाचा अधिकार आहे. ह्या सर्व सोयी सुविधा देऊन सरकार आपल्यावर दया करत नाही.
- या देशामध्ये जेवढं काही नैसर्गिक संसाधने (जमीन, नद्या, समुद्र, किनारे, खनिजे, पर्वत, हवा इ.) आहेत. ती सगळी लोकांच्या मालकीची आहेत. त्यांचा वापर सर्वांच्या हितासाठीच झाला पाहिजे.

जनताच खरी मालक!

भारत माझा देश आहे आणि देशाच्या साधन संपत्तीवर सर्वांचा मालकी हक्क आहे.

आपण कोण आहोत देशाचे? मालक! देशाचा सातबारा तुमच्या नावावर आहे का?

मग काय आहे जे आमच्या मालकीचे आहे?

- बघा, या देशातली साधन संपत्ती कोणाच्या मालकीची? आमच्या.
- त्याचा वापर कोणासाठी झाला पाहिजे – आपल्यासाठी. तसं देशातल्या सगळ्या सरकारी गोष्टी कोणाच्या मालकीच्या? तुमच्या मालकीच्या!
    - हे सरकारी रस्ते कोणाचे? माझ्या मालकीचे!
    - सरकारी शाळा कोणाच्या? माझ्या मालकीच्या!
    - सरकारी दवाखाने कोणाचे? माझ्या मालकीचे!
    - सरकारी बस, रेल्वे कोणाची? माझ्या मालकीची!
    - हे सरकारी विमान कोणाचं? माझ्या मालकीचं!
    - हे सगळं बोलताना लक्षात ठेवा - हे सगळं तुमच्या मालकीचं आहे! तुम्ही साधी सुधी माणसं नाही आहात.
- सरकारी बस, शाळा, दवाखाने, रस्ते यांची मालकी आपली आहे - तर ते नीट ठेवणं ही सुद्धा आपली जबाबदारी आहे. आणि नीट ठेवणं इतकच नाही, तर आता मला सांगा जर सरकारी शाळा बंद होत असेल तर कोणाच्या मालकीची शाळा बंद झाली? - आमच्या/आपल्या
- जर दवाखाने खाजगी होत असतील तर कोणाची मालकी चालली गेली? – आपली
- आणि खाजगी झाली म्हणजे मालकी कोणाकडे गेली? उद्योगपतीकडे, एका कोणाकडे तरी गेली. मग याविरोधात बोललं पाहिजे की नाही?
- आपली गाडी कोणी चोरली आणि विकून टाकली आणि म्हटलं की आता तुमच्या गाडीत बसायचं असेल तर तुम्हाला पैसे मोजावे लागतील. चालतील का? मग आपल्या मालकीची बस जेव्हा खासगी होते आणि त्यासाठी आपल्याला खासगी वाहनांच्या भावाने पैसे मोजावे लागतात, ते कसे चालेल?
- समाजवाद अजून असं म्हणतो, की या देशामधली गरीब आणि श्रीमंतीची दरी कमी झाली पाहिजे.

धर्मनिरपेक्ष

- सरकार सर्व धर्मांना समान व न्याय्य वागणूक देईल.
- देशाचा कोणताही धर्म नाही.
- सरकार, न्याय व्यवस्था, प्रशासन नागरिकांमध्ये धर्माच्या आधारावर भेद करणार नाही.

लोकशाही-गणराज्य: एक व्यक्ती – एक मत, एका मताचे एक, मूल्य

- गावचा प्रमुख कोण असतो? सरपंच ⟶ सरपंच कोण बनेल हे कसं ठरतं? गावकरी एकत्र येऊन मतदान करतात आणि जास्त मते मिळालेली व्यक्ती सरपंच होते.
- मत कोण देऊ शकतं? गावातील सर्व मतदार (18 वर्षांपुढील).
- स्त्री की पुरुष? हिंदू की मुस्लिम? श्रीमंत की गरीब? सगळे देऊ शकतात.
- सर्वांच्या मताचे मूल्य वेगवेगळे आहे की समान आहे?
- गरीब मत देईल तर 1 मत आणि श्रीमंत व्यक्ती मत देईल तर 10 मतं असं आहे का?
- म्हणजे एक व्यक्ती एक मत आणि एका मताला एक मूल्य असे आहे!
- देशातला सगळ्यात मोठा उद्योगपती असो किंवा सगळ्यात गरीब आदिवासी महिला—दोघांच्याही मताची किंमत सारखीच आहे.

लोकशाही-गणराज्य: देशाचे सर्वोच्च पद

- आपल्या राष्ट्रपती कोण आहे – मा. द्रौपदी मुर्मू
- त्यांचे वडील राष्ट्रपती होते ना? नाही. मग आई असेल? आजी तरी असेलच? मग घरातला कोणीच राष्ट्रपती नसताना एखादी महिला आणि त्यातल्या त्यात आदिवासी महिला या देशाची राष्ट्रपती बनू शकली. कशामुळं? फक्त संविधानामुळे नाही – तर संविधानातल्या गणराज्य या शब्दामुळे.
- आपण लोकशाही गणराज्य स्वीकारलं म्हणजे राज्याचा प्रमुख (राष्ट्रपती – सर्वोच्च स्थानी असणारी व्यक्ती) वंशपरंपरेने नसतो, तर तो लोकांनी निवडलेला असतो.

लोकशाही-गणराज्य

कितीही बहुमताचे सरकार आले, तरी त्यांना कारभार मात्र संविधानाप्रमाणेच करायचा. त्यात अल्पसंख्यांक लोकांचा सुद्धा सन्मान झाला पाहिजे. त्यांचं स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे.

आता आपल्याला हे स्पष्ट झालं असेल की देश घडवायचा म्हणजे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही व गणराज्य असा देश आपल्याला घडवायचा आहे. हे घडविण्याची जबाबदारी 'आम्ही भारताचे लोक' म्हणजे आपल्यावरच आहे.
जर देश योग्य मार्गाने घडत नसेल तर याला जवाबदार कोण? आपणच!

देश कोणत्या मार्गाने घडवायचा?

आता यानंतर तो कोणत्या मार्गाने घडवायचा आहे हा प्रश्न उपस्थित राहतो. देशाचे ध्येय / उद्दिष्ट काय आहे तर याचे उत्तर सुद्धा संविधान निर्मात्यांनी दिलेले आहे. याच्यासाठी त्यांनी चार मूल्ये – न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता सांगितलेली आहेत. या चार मूल्यांच्या माध्यमातून आपल्याला देश घडवायचा आहे. असं समजा, की ही चारचाकी गाडी आहे आणि त्याची ही चार चाके आहेत.

न्याय: सामाजिक, आर्थिक, राजनैतिक

- **सामाजिक न्याय** म्हणजे या देशातील वंचित घटकांना पुढे येण्याची संधी देणे.
- **आर्थिक न्याय** देशामध्ये असलेल्या संपत्तीचे न्यायपूर्ण वाटप म्हणजे.
- आणि समाजातील जे घटक निर्णय प्रक्रियेत, राजकीय प्रक्रियेत मागे राहिले आहेत त्यांना सामावून घेण्यासाठी **राजनैतिक न्याय**.

न्याय समजून घेण्यासाठी, एक उदाहरण पाहूया:

कोल्हापुरातल्या बावडा बंगल्याच्या आवारात सर्व नोकरचाकरांची कामं सुरू होती. त्यात गंगाराम कांबळे हे सरकारी पागेतील मोतद्दारही होते. तेथील काही उच्चभ्रु समाजातील कर्मचाऱ्यांनी गंगारामला मारहान केली. कारण होतं, त्यानं पाणी पिण्यासाठी उच्चवर्णीय समाजासाठी असलेल्या हौदाला स्पर्श केल्याचं.

खरं तरं १९१९ ला शाहू महाराजांनी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचा जाहीर हुकूम काढला होता. महाराजांचं या संदर्भातलं धोरण माहीत असूनही त्यांच्या संस्थानात ही घटना घडली होती. हे सर्व घडत असताना महाराज काही कामानिमित्त दिल्लीला गेले होते.

दिल्लीहून परत येताच सर्व प्रकार गंगारामने महाराजांना सांगितला आणि गंगाराम समोर त्या कर्मचाऱ्यांना शिक्षा झाली. शाहु महाराजांनी गंगारामला जवळ घऊन म्हणाले "जा, गंगाराम तुला नोकरी माफ केली. तू कोणताही स्वतंत्र धंदा कर. लागेल ती मदत माझ्याकडे माग."

पुढे काही दिवसांतच गंगाराम कांबळे यांनी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनानं कोल्हापुरातील भाऊसिंगजी रोडवर 'सत्यसुधारक' हॉटेल सुरू केलं.

गंगाराम यांना हॉटेल काढून देण्याचाच फक्त त्यांनी निर्णय घेतला नाही. एका अस्पृश्य समाजातील माणसाचे हॉटेल चालावे त्यांनी एक नामी शक्कल लढवली. इतिहासात आजही ती सुवर्णक्षरांनी कोरली गेली आहे. सकाळच्या वेळेला शाहू महाराज घोडागाडीतून फेरफटका मारत असत. यावेळी शाहू महाराज गंगाराम कांबळे यांच्या हॉटेलसमोर थांबून

भारदस्त आवाजात घोडागाडीमध्ये बसलेल्या सर्वांना गंगाराम यांना चहा आणायला सांगत. स्वत: शाहू महाराज गंगारामच्या हातचा चहा घेतात म्हटल्यावर घोडागाडीतील सर्वांना चहा पिणे भाग पडे.

शाहू महाराज एवढ्यावरच थांबले नाहीत त्यांनी यानिमित्ताने समाजातील जातीपातीला मूठमाती मिळावी यासाठी यानिमित्ताने प्रयत्न केले. शाहू महाराजांची सही कुणाला हवी असेल तर गंगाराम कांबळे यांच्या सत्यसुधारक हॉटेलमध्येच या म्हणून सांगितले जात असे. यामुळे गंगाराम यांच्या हॉटेलवर नागरिकांची मोठी गर्दी होऊ लागली. यावेळी शाहू महाराज येणाऱ्या प्रत्येकाला गंगाराम कांबळे यांच्या हातचा चहा पाजून मगच सही करत.

शाहू महाराजांनी गंगाराम कांबळे यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. हेच गंगाराम कांबळे पुढे अस्पृश्य समाजाचे पुढारी बनले. अस्पश्योध्दाराच्या काळात महाराजांचे ते कार्यकर्ते झाले. शाहू महाराजांच्या निधनानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्य मुक्तीच्या लढ्यात कोल्हापूर संस्थानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निष्ठवान कार्यकर्ते म्हणून कार्यरत राहिले.

स्वातंत्र्य: विचार व अभिव्यक्ती

- विचार: भारतीय संविधानाने प्रत्येकाला स्वतंत्रपणे विचार करण्याचं, लिहिण्याचं, बोलण्याचं स्वातंत्र्य दिलं.
- अभिव्यक्ती: जो विचार करतो, तो मांडण्याचे स्वातंत्र्य आहे.

स्वातंत्र्य: विश्वास- श्रद्धा-उपासना

- विश्वास - श्रद्धा -उपासना: प्रत्येकाला स्वतःच्या पंथानुसार किंवा धर्मानुसार त्याच्या श्रद्धा आणि उपासना जोपासण्याचं स्वातंत्र्य या संविधानाने दिलं. प्रत्येकाला कोणताही देव, धर्म, प्रार्थना पद्धत मानन्याचे, किंवा न मानण्याचे स्वातंत्र्यदेखील संविधान देते.
- म्हणजे संविधानाने आपल्याला - बोलण्याचं,..... भाषा, पोशाख, अन्न, श्रद्धा, पूजा-व्रत, सण-उत्सव, कला (नृत्य, संगीत, चित्रकला), जीवनशैली, सामाजिक मूल्यं, परंपरा, फिरणं, व्यवसाय, इ. यांना लागू होतात. प्रत्येकाला त्याच्या आवडी निवडीप्रमाणे जगण्याचं स्वातंत्र्य आहे - कोणीच कोणावर जबरदस्ती करू शकत नाही.

समानता: दर्जाची व संधीची समानता

- **दर्जाची समानता:** कायद्याच्या अंमलबजावणीत समान वागणूक (उदा. न्यायालय, पोलिस).
- **संधीची समानता:** संधींच्या उपलब्धतेत समानता (उदा. नोकरी, शिक्षण).
    - ही गोष्ट ऐका - एकाच गावात चिन्मय आणि राहूल हे दोन मित्र राहतात. चिन्मयचे वडील मोठे व्यापारी आहेत. तर राहूलचे वडील कोरडवाहू शेतकरी आहेत. दोघेही अभ्यासात हुशार आहेत. दोघांनाही डॉक्टर

व्हायचं आहे. तर दोघांपैकी कोण डॉक्टर होवू शकतं? चिन्मय. का बरं? कारण त्याची ऐपत आहे. आणि राहूल? तो नाही होवू शकत. का बरं? कारण तो गरीब आहे.

- कायद्यासमोर दोघे समान म्हणजे माणूस म्हणून दोघेही सारखेच आहेत. ही झाली दर्जाची समानता !

- परंतु फक्त दर्जाची समानता असून चालत नाही. कसं ते बघू. पण संधीची समानता आहे का? नाही. मग ती कशी मिळेल? म्हणूनच राहूलसारख्या गरीब विद्यार्थ्यांसाठी सरकार शिष्यवृत्ती देतं. म्हणूनच आपल्याकडे सरकारी मेडिकल कॉलेज उभे केले आहेत. हे सर्व कुणामुळे शक्य झालं? संविधानामुळे. याच नियमानुसार पिढ्यानपिढ्या वंचित ठेवलेल्या घटकासाठी संविधानाने आरक्षणाची तरतूद केली आहे. हे आपण पुढच्या सेशन मध्ये पाहणार आहोत.
- संविधानाने संधीची समानता सर्वांना आहे असं मूल्य प्रस्थापित केल्यामुळे एक आदिवासी महिला देशाची राष्ट्रपती होऊ शकतात, एक दलित महिला देशातील सर्वात मोठ्या राज्याचे मुख्यमंत्री पदी बसू शकतात.

बंधुता

- व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता.
- बघा तुम्ही सगळे शाळा/ कॉलेज मध्ये येता. कशासाठी शिकण्यासाठी. शिक्षक/ प्राध्यापक तुम्हाला शिकवतात.
- आता इथ जर विद्यार्थी आपापसात भांडत राहिले, एकमेकांची खोड काढत राहिले तर शिकणं होईल का?
- आणि सगळे जण जर एकमेकांशी मैत्री करून राहिले तर, शिक्षण पण पूर्ण होइल आणि सर्वांना फायदा होईल. यालाच बंधुता म्हणतात.
- समाजातील विविध जाती धर्माचे लोक एकोप्याने राहिले तर सर्वांचाच विकास होईल, आणि जर भांडत राहिले तर आपला सगळा वेळ त्याच्यातच जाईल, विकास करू शकणार नाही.म्हणून बंधूता महत्वाची आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय

- **स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय:** ही गाडीची चार चाके आहेत एक जरी चाक पंक्चर असेल तर गाडी चालूच शकत नाही.
- आपण गाडी चालवायची जबाबदारी सरकारला दिलेली असते, ती ड्रायव्हर आहे. ड्रायव्हर गाडी व्यवस्थित चालवत आहे की नाही, याकडे कोण लक्ष देणार? तर गाडीचे मालक म्हणजे आपण भारताचे लोक.

संविधान कोणाला अर्पण केलं आहे?

- भारतीय संविधान कोणत्याही देवाला, व्यक्तीला, किंवा एका गटाला अर्पण केलेलं नाही. हे आपणच आपल्याला अर्पण केलं आहे.
- म्हणजे हे संविधान "आपणच आपल्याशी केलेला एक करार" आहे. या करारात आपण स्वतःशी वचन दिलं आहे — की आपण सगळे मिळून एका समतेच्या, स्वातंत्र्याच्या, न्यायाच्या आणि बंधुतेच्या देशात राहणार.
- पण बऱ्याच जणांना माहितीच नाही – की असा करार आपण केलाय!
- संविधान म्हणजे आपण आपल्या देशाची ठरवलेली दिशा आणि ती दिशा शेवटी आपल्यालाच गाठायची आहे.
- संविधान वाचताना हे लक्षात ठेवा – हे फक्त नियमांचं पुस्तक नाही, तर एक "शपथ" आहे – एकमेकांसोबत चालायची.
- तर चला, आपण मिळून **संविधान शपथ** घेऊयात

मी संविधानामध्ये दिलेल्या मूल्यांचे पालन करेन.
मी कोणत्याही व्यक्तीचा द्वेष करणार नाही.
मी लोकांमध्ये एकता-बंधुभाव वाढवण्यासाठी प्रयत्न करेन.
मी महिलांचा आदर करेन आणि
कुणालाही महिलांचा अपमान करू देणार नाही.
मी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद यांचा प्रसार करेन.
मी सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करेन व
हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करेन.
संविधानाचे पालन करणे हीच
खरी देशभक्ती आहे, असे मी मानतो/मानते.
त्यामुळे, संविधानाचे पालन करून
मी खरा देशभक्त बनेन.

जय हिंद! जय संविधान!

संविधान जागर अभियान

संविधान जागर अभियान निमंत्रक समिती: मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

संविधान आणि इतर सामाजिक विषयावरील अधिक माहिती **samvidhanjagar.org** वेबसाईटवर वर मिळेल.

स्वप्निल फुसे: 79723 45764 डॉ. श्याम मुडे: 94047 08852 श्रद्धा रेखा राजेंद्र: 92704 78335 राजाभाऊ करवाडे: 98222 02739

संविधान जागर अभियानाशी जोडण्यासाठी वरील नंबरवर संपर्क करा. **samvidhan.jagar**